



॥ सा विद्या या विमुक्तये ॥

Balasaheb Mane Education Trust's

# Rajarshi Shahu Arts and Commerce College,

Rukadi, Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur

Affiliated to Shivaji University, Kolhapur, Maharashtra (India)

## One Day Interdisciplinary International Seminar

on

# Reflection of Education in Literature

## साहित्यातील शिक्षणाचे प्रतिबिंब

# CERTIFICATE

Prin./Prof./Dr./Mr./Mrs. सविता सुनिल केंजळे

of कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

participated/ presented a paper entitled 'शिक्षणामुळे प्रभावित स्त्री सुधारणा आणि मराठी साहित्य'

in the One Day Interdisciplinary International Seminar on 'Reflection of Education in Literature' organized by Rajarshi Shahu Arts and Commerce College, Rukadi, Dist. Kolhapur, Maharashtra (India) on 1 March, 2019.

Dr. Girish More
Coordinator

Principal Dr. Arjun Rajage
Convener

# ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (EIIRJ)

A Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
SJIF Impact Factor : 6.21 ISSN : 2277-8721
Vol. VIII Special Issue – I, March 2019


# REFLECTION OF EDUCATION IN LITERATURE

# साहित्यातील शिक्षणाचे प्रतिबिंब


■ EDITORIAL BOARD ■

**Prin. (Dr.) Arjun Rajage**
Rajarshi Shahu Arts & Commerce College, Rukadi

**Dr. Girish More**
Department of Marathi, Rajarshi Shahu Arts & Commerce College, Rukadi

**Dr. Uttam Patil**
Department of English, Rajarshi Shahu Arts & Commerce College, Rukadi

**Mr. Shankar Dalavi**
Department of Hindi
Rajarshi Shahu Arts & Commerce College, Rukadi

**Dr. S.B. Biradar**
Department of English, SVM College, Ilkal (Karnataka)

**Dr. Sabiha S. Sayyad**
Department of Urdu, Night College of Arts and Science, Ichalkaranji



# RAJARSHI SHAHU ARTS AND COMMERCE COLLEGE, RUKADI

Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur 416 118
E-mail: rajshahurkd@yahoo.com, Website: www.rajshasuruk.in

| Sr. No. | Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 42 | The Reflection of Education in George Orwell's *Animal Farm* | Dr. Arun Jadhav | 121 |
| 43 | Reflection of Education and the Changing Image of Woman in Indian Women Writers | Mrs. Sunita J. Velhal | 124 |
| 44 | Denial of Space And Marginalization of Woman Reflected in Mahesh Dattani's *Tara* | Dr. Dilawar Yusuf Jamadar | 127 |
| 45 | Reflection of Education in Chetan Bhagat's *Five Point Someone* | Dr. Mrs.Patil Manik Shantinath | 129 |
| 46 | Literature is Education | Raghunath .D.Dhamakale | 131 |
| 47 | The Role of Education and Literature in Imparting Ethics in Society | Mrs.Yadav Shubhada Sachin | 134 |
| 48 | Women Reformation through Education in India | Dr. Vijay .B. Desai | 137 |
| 49 | The Instinct Of Education in Kishor Kale's "Against All Odds" | Mr. Kamble Rajiv Bhimrao | 140 |
| 50 | Conflict in Jhumpa Lahiri's The Namesake | Prof. Nilesh Uttamrao Hume<br>Mr. Rajkiran Jotiram Biraje | 142 |
| | **MARATHI SECTION** | | |
| 51 | 'भेटलं मांग फिटलं पांग!' : मधील समकालीन शिक्षण | प्रा. डॉ. शरद गायकवाड | 145 |
| 52 | तृतीयरत्न आणि स्थानिकस्वराज्य नाटकांतील शैक्षणिक विचार | प्रा. डॉ. दत्ता पाटील | 149 |
| 53 | 'बनगरवाडी व निशानी डावा अंगठा' मधील शिक्षक | डॉ. कांबळे अजित यल्लाप्पा | 153 |
| 54 | शिक्षणामुळे प्रभावित स्त्री सुधारणा आणि मराठी साहित्य | डॉ. वर्षा शिरीष फाटक | 155 |
| 55 | १९ व्या शतकातील समाजसुधारकांच्या लेखनातील स्त्री शिक्षणाचे महत्त्व आणि चित्रण | डॉ. नंदिनी गणपती काळे | 158 |
| 56 | मुक्ता साळवेचा धगधगता हुंकार | प्रा.डॉ.सुनिता श्रीपती कांबळे | 161 |
| 57 | 'नामशेष होणारा माणूस' आणि शिक्षण | प्रा.प्रकाश हुलेनवर | 164 |
| 58 | 'काहिली' या कादंबरीतील भ्रष्ट शिक्षणव्यवस्थेचे चित्रण | प्रणिता शिवाजी वंगलवार | 167 |
| 59 | शिक्षण व्यवस्थेतील जातीयता व धार्मिकता यांवर भाष्य करणारी 'काजळ्यादिशा' | प्राची जोशी | 170 |
| 60 | 'कोसला'तील विद्यार्थी शिक्षक संबंध | प्रो.प्रभाकर भिमराव कांबळे<br>प्रा.प्रमोद गुणवंत चौधरी | 173 |
| 61 | महात्मा फुले यांचे साहित्य आणि शैक्षणिक कार्य | प्रा. डॉ. शिवाजीराव पाटील | 176 |
| 62 | शिक्षणामुळे प्रभावित स्त्रीसुधारणा आणि मराठी साहित्य | डॉ.एन.व्ही.शिंदे | 179 |
| 63 | रविंद्र शोभणे यांच्या पांढरे हत्ती कादंबरीतील शिक्षण व्यवस्थेचे वास्तव | प्रा. सौ. एस. व्ही. मोहिते | 183 |
| 64 | वामन जाधव यांच्या कादंबरीतील शिक्षणाची दाहकता | प्रा. नवनाथ विश्वनाथ पाटोळे | 185 |
| 65 | वैदिककालीन शिक्षणपद्धती आणि आधुनिक शिक्षणात तिची उपयुक्तता | प्रा. रचना सौरभ शहा | 188 |
| 66 | मराठी मुस्लीम साहित्याचे स्वरूप | अंकुश भारत घुले<br>स्वाती अरुण व्हनकडे | 191 |
| 67 | महाविद्यालयीन व उच्च शिक्षणाचे मराठी साहित्यातील प्रतिबिंब | प्राचार्य डॉ. प्रकाश पाटील | 194 |
| 68 | शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार व शोषण | प्रा.कदम संभाजी धोंडीराम | 196 |
| 69 | शिक्षणामुळे मराठी साहित्यात उमटलेला आवाज (दलित, आदिवासी, मुस्लीम, भटके – विमुक्त) | प्रा. डॉ. सतीश मस्के | 199 |

| Sr. No. | Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 70 | शिक्षण - साहित्य : अनुबंध आणि काही निरीक्षणे | डॉ. राजेंद्र जयराम खंदारे | 202 |
| 71 | शिक्षण व साहित्य परस्पर संबंध : एक अभ्यास | प्रा.डॉ.उन्मेष शेकडे | 205 |
| 72 | शिक्षणामुळे बदललेल्या कुटुंबातील 'आमचा बाप' चा जीवनसंघर्ष | प्रा.डॉ.आर.डी. कांबळे | 209 |
| 73 | संस्कृत साहित्यातील शिक्षणाचे प्रतिबिंब | प्रा. श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे | 212 |
| 74 | माझी काटेमुंढरीची शाळा ; शिक्षणाचे अधिक उण्या स्वरूपाचे एक चित्र | विपिन नारायण वैराट | 216 |
| 75 | वामन जाधव यांच्या कादंबरीतील शिक्षणाचे भयाण वास्तव | डॉ. हिराचंद रोहिदास मोरे | 220 |
| 76 | अशोक पवार यांच्या कादंब-यातील शिक्षण | संजय वारके | 223 |
| 77 | मराठी कवितेच्या शिक्षणातून रुजवलेली मानवी मूल्ये | प्रा.डॉ.आनंद वारके | 225 |
| 78 | योगीराज वाघमारे यांच्या कादंबऱ्यांतील शिक्षणाचे प्रतिबिंब | डॉ. सारीपुत्र तुपेरे | 229 |
| 79 | शिक्षक – विद्यार्थी नातेसंबंधाचा हृद्य आविष्कार – 'झेल्या' व 'चितळे मास्तर' | डॉ. रचना सचिन माने | 233 |
| 80 | कौटुंबिक नातेसंबंधांवर शिक्षणाचा झालेला परिणाम आणि मराठी साहित्य | सौ. विजयालक्ष्मी वि. देवगोजी | 235 |
| 81 | महात्मा फुले यांच्या साहित्यातील शिक्षण विषयक विचार | प्रा. बाळासो आ. सुतार | 237 |
| 82 | 'माझा बाप बल्लया' : शिक्षणासाठीचा संघर्ष | प्रा. प्रकाश नाईक | 241 |
| 83 | शिक्षण व्यवस्थेतील अनैतिकता भ्रष्टाचार शोषण : 'कोंडणातील जिणं' | डॉ. **डिगोळे बि.** व्ही. | 243 |
| 84 | 'भंगार' मधील शिक्षणाचा जागर | डॉ. लता पांडुरंग मोरे | 246 |
| 85 | मराठी साहित्यातील शिक्षणाचे चित्रण : विदारक तरीही स्वागतार्ह | डॉ. युवराज देवाळे | 248 |
| 86 | लोक माझे सांगाती'मधील शरद पवारांची शैक्षणिक भूमिका | मोतीराम पौळ | 251 |
| 87 | **बनगरवाडी कादंबरीतील 'शिक्षण'** | **डॉ. मारुती पांडूरंग डेळेकर** | 254 |
| 88 | आधुनिक मराठी साहित्यावरील शिक्षणाचा प्रभाव | प्रा. डॉ. निलेश एकनाथराव लोंढे | 256 |
| 89 | **स्त्री शिक्षण चळवळीचा मराठी साहित्यावरील प्रभाव** | **निलम प्रदीप पाटील** | 260 |
| 90 | "फेसाटी" कादंबरीतील युवकाचा शिक्षणसंघर्ष | सुनील श्रीशैल बुद्धनावर | 265 |
| 91 | ''निशाणी डावा अंगठा'' मध्ये चित्रीत झालेला प्रशासन व्यवहार | डॉ. सुभाष गणपती जाधव | 270 |
| 92 | शिक्षणामुळे प्रभावित स्त्रीसुधारणा आणि मराठी साहित्य | डॉ. सविता सुनील केंजळे | 274 |
| 93 | ग्रामावकाशातील जनिच्या शिक्षणाची संघर्षमय करूण कहाणी : 'झिम् पोरी झिम्' | प्रा.लक्ष्मण व्यंकट बिराजदार | 277 |
| 94 | दलित आत्मकथनांतील शैक्षणिक संघर्ष | डॉ. सतीश कामत | 280 |
| 95 | 'तळ ढवळताना' या काव्यसंग्रहातील शिक्षणव्यवस्थेचे चित्रण | डॉ. अशोक नामदेव शिंदे | 283 |
| 96 | वाणीकिडे : शिक्षणव्यवस्थेतील अनैतिकता, भ्रष्टाचार आणि शोषण | शैला आनंदराव क्षीरसागर | 287 |
| 97 | 'परिस्थितीला दिवस जातात तेव्हा...' मधील शिक्षणाचे महत्त्व | डॉ. प्रमोद भीमराव गारोडे | 290 |
| 98 | 'जुबा' कादंबरीतील शिक्षक | डॉ. वैशाली तातोबा चौगुले | 293 |
| 99 | साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबरीतील शिक्षण | डॉ. गिरीश मोरे | 296 |
| 100 | आचार्य विनोबा भावे यांचे शिक्षणविचार | डॉ.महेश नारायण गायकवाड | 299 |

# शिक्षणामुळे प्रभावित स्त्रीसुधारणा आणि मराठी साहित्य

**डॉ. सविता सुनील केंजळे**
**मराठी विभाग प्रमुख**
कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज, जि. सातारा
मोबा. नं. ९४२१२१२०२१

शिक्षण हे सुधारण्याचे साधन आहे शिक्षणातून जो नैतिक समाज निर्माण होतो त्यातून चांगला नितीमान समाज निर्माण होतो. शिक्षण ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणामुळे सामाजिक व सांस्कृतिक प्रगती साधता येते. स्त्रीसुधारणा व त्यासाठी स्त्रीशिक्षण हे १९ व्या शतकातील सर्वात मोठी सुधारणा म्हणता येईल राजाराम मोहन रॉय व स्वामी दयानंद इत्यादीच्या पुढाकाराने सतीबंदीचा कायदा १८२९ साली झाला विधवा विवाहाला मान्यता, स्त्रीशिक्षण, विधवांसाठी आश्रम अश्या अनेक चळवळी १९ व्या शतकाच्या मध्यापासून पुढे जवळजवळ शंभर वर्षे होत राहिल्या. १८५६ मध्ये विधवाविवाहाला मान्यता देणारा कायदा मंजूर झाला पंडीता रमाबाई १८८९ मध्ये विधवा व कुमारिकांनसाठी 'शारदासदन' ही शाळा सुरु केली. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी विधवांसाठी आश्रम व नंतर शाळा १९१६ मध्ये पुण्यातील भिडे वाडयात मुलीची पहिली शाळा महात्मा जोतीरावांनी काढली. सावित्रीबाईना ही त्यांनी शिकवले भारतातील पहिल्या शिक्षिका विचाराने आणि काळाने कितीतरी पुढे असलेल्या सावित्रीबाईनी 'शिक्षणाने बाईला मनुष्यत्व येते आणि पशुत्व हरते' ही स्त्री मुक्तीची संकल्पना कितीतरी आधी सांगून टाकली शैक्षणिक चळवळीची फलश्रुती म्हणून पुढे डॉ. आनंदीबाई जोशी, रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई अशा कितीतरी कर्तबगार स्त्रियां महाराष्ट्रात जन्माला आल्या. स्त्रिया राजकारणातही आल्या. शिक्षणाने स्त्रियांना धैर्य दिले. हालअपेष्टांना तोंड देण्याचे सामर्थ्य स्त्रीशिक्षणामुळे आले. १९०९ व १९२९ च्या राजकीय सुधारणा कायद्यात स्त्रियांना मर्यादित मतदानाचा अधिकार मिळाला. बालविवाहावर बंदी आली पहिल्या महायुध्दात अपरिमीत झालेल्या हानीमुळे आर्थिक स्थिती खालावली त्यामुळे स्त्रिया अर्थाजन करू लागल्या. स्वांतत्र्यप्राप्तीमुळे स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली. स्त्री शिक्षणाला गती मिळाली त्यानंतर स्त्रीपुरुष समानतेची पहिली मांडणी गोपाळ गणेश आगरकर यांनी केली स्त्रियांनाही पुरुषाप्रमाणे उच्च शिक्षण दिले पाहिजे स्त्री– पुरुषांनी एकत्रीत शिक्षण घ्यावे स्त्रियांनी हवी ती विदया आत्मसात करावी. पाहीजे तेव्हा लग्न करावे असे कित्येक काळाच्या पुढे असलेले विचार आगरकरांनी १०० वर्षापूर्वी मांडले. गांधीजीनी खादीधारी निर्भय स्त्री समाजापुढे उभी केली. संमती वयाला, विधवा पुनर्विवाहाला, घटस्फोटाच्या हक्काला मान्यता दिली. डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिल मांडले स्त्रियांना संपत्तीचा अधिकार, वारसाचा अधिकार, घटस्फोट घेण्याचा अधिकार प्राप्त करुन दिला. आचार्य विनोबा भावे व आचार्य दादा धर्माधिकारी यांनीही स्त्रियांच्या सामर्थ्याची ओळख करुन देणारे विपुल लेखन केले. स्त्रिया लिहित्या झाल्या या सर्वात आधी ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री–पुरुष तुलना' हा निबंध लिहिला व स्त्रियांच्या अन्यायाला वाचा फोडली. १९व्या शतकात महाराष्ट्रातील स्त्रियांची अवस्था अत्यंत दयनीय होती. तिला शिक्षणाचा अधिकार नव्हता, निर्णयस्वातंत्र्य नव्हते. चूल व मुल येवढेच तिचे कार्यक्षेत्र होते. बालविधवांच्या समस्या होत्या. स्त्रीला अनेक दोषांचे आगर, पापांचे माहेर मानले जाई. या सा–याचा खरपूस समाचार ताराबाईनी आपल्या निबंधातून घेतला. हा लेख मार्मीक, सडेतोड, आक्रमक आहे.

भारतात स्त्रियांबद्दल एक गैरसमज असतो. आसपासच्या कोणत्याही प्रकारच्या सामाजिक घडामोडींपासून या स्त्रिया पूर्णतः दूर असतात. जगातील घडामोडी, आर्थिक व्यवहार, राजकीय हालचाली, एवढेच नव्हे तर सामाजिक सांस्कृतिक उत्सव, समारंभ, साहित्य यांच्याशी त्यांचा सुतराम संबंध नसतो त्या शांत, सालस, भित्र्या व आदर्श असतात असा त्याबद्दल विचार प्रवाह होता; परंतु साहित्यात आढळणारी स्त्री, कणखर स्वतःच्या बुध्दीने चालणारी, विचार करणारी यांची छाप आढळते. स्त्री निसर्गतः दुबळी असून तिच्या संरक्षणाची जबाबदारी पुरुषावर आली किंबहुना पुरुषांनी ती स्वीकारली. तिला अजून कसे दुबळे करता येईल, हे पाहिले. भारत स्वतंत्र

झाल्यावर इथल्या सामाजिक जीवनात विविध बदल झाले. शिक्षणाचा प्रसार झाला स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या चळवळीमधून स्त्रीवादी साहित्याची बैठक तयार होत गेली. स्त्रिया उच्च शिक्षण घेऊ लागल्या नोकरी करू लागल्या. त्यातूनच त्यांना आपल्या 'स्व' ची ओळख झाली. स्त्रीला शिक्षण देण्याची गरज नाही. हीच अनेक शतकापर्यंत भूमिका होती; परंतु १९६० नंतर ज्या चळवळी झाल्या त्यातून स्त्रीमुक्ती विषयक चळवळीची वैचारिक बैठक तयार करण्यात आली. शिक्षणामुळे हळूहळू का होईना धार्मिक वृत्ती, कर्मकांड, व्रतवैकल्ये यांतून तिने स्वतःची सुटका करुन घ्यायला सुरुवात केली. १९७५ नंतर स्त्रीवादी विचारसरणी मांडणारा स्वतंत्र प्रवाह आला या प्रवाहाने स्त्रीला आत्मभान दिले.

स्वांतत्र्यानंतर घटनात्मक समानता स्त्रीला मिळाली. मतदानाचा हक्क मिळाला. शिक्षणाचा विरोध संपला १९६० नंतर स्त्रिया स्वतःच्या अस्तित्वाचा विचार करू लागल्या. आपल्या हक्काविषयी जागृत झाल्या. हरीभाऊ आपट्यांनी तत्कालीन स्त्रियांची होणारी घुसमट आपल्या 'पण लक्षात कोण घेतो' या कांदबरीतून दाखविली स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने विचार करताना 'वामन मल्हार जोशी' यांच्या १९३० साली प्रसिध्द झालेल्या 'सुशीलेचा देव' ही नव्या स्त्रीचे दर्शन घडविण्या–या कादंबरीला विशेष महत्व आहे. डॉ.केतकरांनी स्त्रीजीवनाचे व्यापक दर्शन घडविले त्यांनी ब्राम्हकन्या, विचक्षणा, या कांदब–या मधून स्त्रीजीवनाचाच विचार केला. स्त्रिया– स्त्रियांमध्ये भिंती निर्माण करण्याचे काम पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्थेने केले; परंतु १९६० नंतर ख–या अर्थाने छाया दातार विद्याबाळ यांनी आपल्या लिखाणातून सडेतोड मते मांडली. शिक्षणामुळे स्त्रिया बाहेरच्या जगाशी जवळीक साधू शकल्या वाचन वाढले वाचनामुळे विचारप्रवाह पक्का झाला. व्यक्त होणे सोपे झाले. शिक्षणामुळे आत्मभान आलेल्या स्त्रिया लिखाण करताना आपली मते परखड पणे मांडू लागल्या. आधुनिक काळातील स्त्रियांचे लिखाण, साहित्य बंडखोर, प्रस्थापित पुरुषप्रधान मूल्यव्यस्थेचा प्रतिकार करणारे व ती उलथून टाकण्याची शक्यता व शक्ती दाखवून देणारे विपूल व वैविध्यपुर्ण लेखन स्त्रियांनी केले. इ.स. १९७५ नंतर च्या काळात स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह निर्माण झाला कथा, कांदबरी, आत्मचरित्र, नाटक, कविता, समीक्षा, वैचारिक लेखन इत्यादी वाङ्मय क्षेत्रात स्त्रीवादी जाणिवेने झेप घेतलेली दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रियांचे लेखन हे पहिल्या टप्प्यातील लेखन होते यात, घरगुती, कुटुंब, पुरुषप्रधान संस्कृतीतील श्रद्धा व निष्ठा जपणा–या विषयावर आधारीत होते. या परंपरेला छेद देऊन विचार पर्वाचे पहिले पाऊल विभावरी शिरुरकरांनी टाकले १९३३ मध्ये 'कळयांचे निश्वास' ह्या कथासग्रहातून कुमारिकांचे अंतरंग त्यांच्यावर येणारी संकटे दाखवून दिली. स्त्री प्रश्नांची मानसिक बाजू त्यांनी फार प्रभावीपणे मांडली विभावरी शिरुरकर व गीता साने यांनी स्त्रीवादाला साहित्यात गुंफण्याचा प्रयत्न केला. इ.स. १९५० ते १९७५ च्या पर्वातील लेखन यात आत्मभान व सामाजिक परिवर्तनाचे चित्र स्पष्ट होते. इ.स. १९७५ नंतरचे लेखन हे विकासपर्वातील लेखन आहे. यामध्ये पुरुषकेंद्री मूल्याबाबत विरोधात्मक जाणीव, लिंगवर्चस्ववादाचा प्रतिवाद आणि प्रसंगी बंडाचे निशाण दिसून स्त्रीसाहित्यातून घर, कुटूंब, विवाह, समाज, संस्कृती, परंपरा, शिक्षण, पुरुषी मानसिकता इत्यादी संदर्भातील अनुभवही बदलताना दिसतात. स्त्रीवादी साहित्यातून नकार व बंडखोरी प्रकर्षाने आढळते. रिटा वेलीणकर या कांदबरीचा विचार करु लागल्या. रिटा वेलीणकर मधील रीटाच्या जीवनाची अवस्था व तिच्या समोरील प्रश्न हे आस्वादाच्या पातळीवर रिटाचे असले तरी ती एकूण पुरुषप्रधान संस्कृतीमधील सर्व स्त्रियांची अवस्था आहे. रिटासमोर अनेक प्रश्न आहेत. शांता गोखलेच्या या कादंबरीत काव्यात्मक्ता आहे.

वरील विषयाच्या अनुषंगाने इंदुमती जोंधळे यांच्या 'बिनपटाची चौकट' या आत्मचरित्राचा विचार करता येईल. १९२० नंतरच्या मराठी चरित्र, आत्मचरित्र वाङ्मयातील एक उल्लेखनीय आत्मचरित्र म्हणून सौ.इंदूमती जोंधळे यांच्या आत्मचरित्राचा उल्लेख करावा लागतो. अनाथाश्रमात वाढलेल्या आणि जिद्दीने आपले शिक्षण पूर्ण केलेल्या एका स्त्रीची करून कहानी आहे. संशयातून आईचा खून वडील करतात ते तुरुंगात जातात व मुले अनाथ होतात. इंदू आतेभावाच्या घरी राबराब राबते. नंतर ती रिमांडहोम मध्ये दाखल होते. त्यानंतर तिच प्रवास रिमांडहोम, अनाथाश्रम छात्रालय, हॉस्टेल या माध्यमातून झाला. कोल्हापूरच्या छात्रालयात राहिल्यामुळे ख–या अर्थाने आपला विकास झाला, असे इंदू सांगते. शिक्षकांनी शिक्षणात खंड पडू दिला नाही. इंदूच्या

मनात आपल्या शाळेबद्दल. गुरुजनांबद्दल अतिशय आदर होता. शाळा कॉलेज मधील प्रत्येक कार्यक्रमात ती आघाडीवर होती. कोल्हापूरच्या उषाराजे हायस्कूलमध्ये ती शिक्षकप्रिय विदयार्थ्यांनी होती. कॉलेज शिक्षणासाठी त्या औरंगाबादला आल्या महाविद्यालयातील सर्व क्षेत्रात प्राविण्य मिळविले. एन.सी.सी. युनिट मध्ये उत्कृष्ट असे कार्य केले. त्यामुळे त्यांच्या अंगी धीटपणा आला. महाविद्यालयातील सांस्कृतिक कार्यक्रमात त्या आघाडीवर राहिल्या. महाविद्यालयीन जीवनात यांनी आपल्या व्यक्तीमत्व विकासासाठी पुरेपुर उपयोग करुन घेतला. प्रतिकूल परिस्थिवर मात करीत इंदूताई पदवीधर झाल्या बी.एड् झाल्या त्यामुळे नोकरीची वाट खुली झाली. त्यानंतर त्यांनी महावीर जोंधळ्याशी लग्न केले. वेगळ्या जातीत लग्न केल्यामुळे संसारात दु:खाचा सामनाही त्यांना करावा लागला. तरीही संसार सांभाळून नोकरी करीत त्या दोन्ही आघाड्यांवर यशस्वी होतात. 'बिनपटाची चौकट' हे आत्मचरित्र विविध वैशीष्ट्यांनी नटलेले आहे; परंतु एखादया मुलीच्या आयुष्यात आलेले अनाथपण; परंतु तिला मिळालेली शिक्षणाची संधी त्यासाठी तिने घेतलेले कष्ट, शिक्षणाच्या जोरावर मिळाविलेली नोकरी यामुळे तिच्या जीवनाचे झालेले सोने यावरून असे विधान केल्यास वावगे ठरणार नाही की, जर शिक्षणाचा प्रसार झाला नसता तर इंदुमती जोंधळे यांचा विकास झाला नसता त्याचे जीवन नरकमय झाले असते, आयुष्य दिशाहीन झाले असते. स्त्रियांना शिक्षणामुळे आयुष्य सावरायला ही वाव मिळाला. कोल्हापूरच्या छात्रालयात त्यांना भिडे ताई भेटल्या आण्णासाहेब सहस्त्रबुध्देनी इंदूला आपली मानसकन्या मानले. त्यांनीच इंदूच्या बी.एड्. साठी, नोकरीसाठी, पुढे लग्नासाठी प्रयत्न केला. इंदूचे आयुष्य अनेक संकटांनी भरलेले आहे, अनेक करुन प्रसंग या पुस्तकात आहेत; परंतु शिक्षणाने तिला जगण्याची आणि संकटावर मात करण्याची संधी दिली, हे नाकारता येणार नाही. कधीकधी कष्ट उपसून स्वत:ची करियर नव्हे तर आयुष्य बांधून काढावे; अशी उत्कट उर्मी निर्माण होते शिक्षणाच्या जोरावर आत्मभान जागृत होते. शिक्षणामुळे निर्माण झालेली डोळस जाणीव या आत्मचरित्रात प्रकर्षाने जाणवते.

■ ■ ■